[Type text]


जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर
एमएसईबी समोर, अहमदनगर कॉलेजवळ, स्टेशन रोड, अहमदनगर
Phone NO. 0241-2355342, FAX NO. 0241-2326615
EMail –didic.ahmednagar@maharashtra.gov.in


| टिप्पणी क्रमांक | अधिकारी/ कर्मचारी यांचे नांव | कार्यालयीन टिप्पणी<br>दिनांक-०९/९/२०२१ जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | | विषय:- अहमदनगर जिल्हा निर्यात कृती आराखडा मंजूरीबाबत. **Export Action Plan**<br>मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडे सविनय सादर | |
| | | <u>प्रस्तावना-</u><br>उद्योग ऊर्जा व कामगार विभाग यांचे शा.नि.क्र.निप्रप्र -२०२०/प्र.क्र.२८/उद्योग-७/दि.१९/१०/२०२० नुसार राज्यातील लघु व मध्यम उद्योगांना आंतराष्ट्रीय व्यापारांना सहाय्य करण्यासाठी, संभाव्य निर्यात क्षमता असलेल्या विविध क्षेत्रामधून निर्यात वृध्दी होण्यासाठी, निर्यातीला चालना देण्यासाठी तसेच उद्योजकांना येणा-या अडीअडचणी सोडविण्यासाठी देशात अस्तित्वात असलेलया निर्यात परिषदेच्या धरतीवर महाराष्ट्र निर्यात प्रचालन परिषद मा.मंत्री उद्योग महाराष्ट्र यांचे अध्यक्षतेखाली तर राज्यनिर्यात प्रचालन परिषदेची कार्यकारी समिती मा.मख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आली आहे तर जिल्हास्तरावर मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा निर्यात प्रचालन समिती गठीत करण्यात आली आहे.<br>सदर शासन निर्णयात नमूद केल्यानुसार अहमदनगर जिल्हयाचा ड्राफट **Export Action Plan**<br>तयार करण्यात आला आहे यामध्ये अहमदनगर जिल्हयातून सद्यस्थितीत निर्यात होणा-या उत्पादनाचा, भविष्यात निर्यात होऊ शकणा-या उत्पादनाची माहिती अंर्तभूत करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे उद्याजकांचे उत्पादन निर्यात होण्याच्या दृष्टीने येणा-या मूलभूत अडीअडचणींचा लेखीत समावेश करण्यात आला आहे. यावर जिल्हा निर्यात प्रचालन समितीने करावयाच्या कार्यवाहीची माहिती देखील अंर्तभूत आहे. **Director General of Foreigen Trade Ministry of Commerce And Industry New Delhi** यांचे पूणे विभागीय कार्यालयाने कळविले आहे की, सदरचा एक्सपोर्ट एक्शन प्लॅन जिल्हा निर्यात प्रचालन समितीसमोर चर्चेला ठेवून त्याच्या सूचना असल्यास त्या समाविष्ठ करुन जिल्हा निर्यात कृती आराखडा अंतिम करण्यात यावा. | |

कार्यवाही-

दिनांक-[illegible] रोजी दुपारी [illegible] ४.०० वाजता मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली ऑनलाईन निर्यात प्रचालन समिती बैठक संपन्न झाली सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | कार्यालय |
|---|---|---|
| १. | डॉ.राजेन्द्र ब.भोसले | मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर |
| २. | श्री संतोष स.गवळी | महाव्यवस्थापक, जिल्हा उ केंद्र,अहमदनगर |
| ३. | श्री वरुन सिंग | Jt.DGFT Pune |
| ४. | श्री अभय दप्तरदार | संचालक एमएसएमई मुंबई |
| ५. | श्री नितिन गवळी | विभागीय अधिकारी एमआयड नाशिक |
| ६. | श्री अमोल धाडगे | राज्यकर अधिकारी, जीए कार्यालय, अहमदनगर |
| ७. | शितलकुमार जगताप | जिल्हा व्यवस्थापक ना अहमदनगर |
| ८. | श्री वरुन चुलेट | Asst.Director EEP Pune |
| ९. | श्री महेश आखाडे | निरिक्षक राज्यकर जीए कार्यालय, अहमदनगर |
| १०. | श्री विनायकराव भूसारे पाटील | अध्यक्ष IIAIC,Ahmednagar |
| ११. | श्री राजेंद्र काटारिया | अध्यक्ष आमी अहमदनगर |
| १२. | श्री प्रकाश गांधी | मराठा चेंबर्स ऑफ कॉ इंडस्ट्रिज एमआयडीसी अहमदन |
| १३. | श्री अक्षय राऊत | निर्यात कंन्सल्टंट नाशिक विभा |

सभेच्या सुवरवातीस महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेस सुरुवात केली अहमदनगर **Export Action Plan**
बाबत उपस्थितांना अवगत करुन हा प्लेन अंतिम करुन उद्योग संचालनालयाकडे सादर करावयाचा आहे तसेच जिल्हयात सूरु करावयाच्या **District Export Hub** व एक्सपोर्ट डे बाबत उपस्थितांना अवगत केले.

तदनंतर श्री वरुन सिंग **Jt.DGFT Pune** यांनी ॲक्शन प्लॅन अंतिम करतांना त्यामध्ये यापूर्वी बनवलेल्या ॲक्शन प्लॅनमधील बाबींचा समावेश करावा. असे सूचना केली.

श्री अभय दप्तरदार संचालक एमएसएमई मुंबई यांनी एमएसएमई अंतर्गत होणा-या उत्पादनावर ॲक्शन प्लॅन मध्ये विशेष भर दाव्या अशी सूचना केली.

तर श्री विभायकराव भूसारे पाटील अध्यक्ष

**HAIC,Ahmednagar** यांनी खालीलप्रमाणे सूचना केल्या. कच्ची साखर गुळ ,फळभाजी,यासारख्या कृषि उत्पादनाला निर्यातीसाठी खुप संधी आहे. केशर आंब्याला भारत सरकारचे सर्टिफिकेशन मिळाले असल्याने यावर निर्यात होण्यासाठी भर देण्यात यावा. डाळिंब सिताफळ, व उपपदार्थासाठी मोठी बाजार उपलब्ध आहे. त्यामुळे वरीलबाबींचा आराखड्यातध्ये प्राधान्याने समावेश करण्यात यावा. तसेच अॅग्रीकल्चर ॲनलाईटीकल लॅब सारखी पायाभूत सूविधा होणं महत्याचं आहे. भारतीय शेती माल प्रदर्शनी मध्ये संस्थांना सहभागी करून घ्यावं. निर्यात करणा-या शेतक-यांना निर्यातीसाठी ३ वर्षापर्यंत अनूदान देण्यात यावे.

उपरोक्त प्रमाणे बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनंतर मा.अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी खालीलप्रमाणे सूचना निर्गमीत केल्या श्री विनायकराव भूसारे पाटील सुचविल्याप्रमाणे यांनी उत्पादने साखर, गुळ,केशर आंबा, सिताफळ प्रक्रीया केलेली उत्पादने कांदा प्रक्रीया केलेली उत्पादने आवश्यक इन्फ्रा अन्न प्रक्रीया युनिटस यांचा आराखडयात समावेश करवा.श्री दप्ततरदार एमएसएमई उत्पादनाच्या आराखडयात समावेश करावा. श्री वरुन सिंह यांनी **Jt.DGFT Pune** जूनी निर्यात कृती योजना आराखडा संदर्भित केला जाईल.त्याचप्रमाणे कार्यवाही करावी.उपरोक्त वरील बाबींचा समावेश करुन आराखडयात पुनश्च मंजूरी घ्यावी.

उपरोक्त प्रमाणे दिंनांक-.७/९/२०२१ रोजी दुपारी ठिक ४.०० वाजता संपन्न झालेल्या ऑनलाईन जिल्हा निर्यात प्रचालन समितीची बैठकीचे इतिवृत्ता मान्यतेस्तव सविनय सादर.

(सं.स.गवळी)
महाव्यवस्थापक
जिल्हा उद्योग केंद्र,
अहमदनगर

(डॉ.राजेंद्र ब.भोसले)
जिल्हाधिकारी
अहमदनगर

13/9/21

1920
13 SEP 2021